॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि. १३ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना एककांमध्ये हर घर तिरंगा अभियान-२०२५ राबविण्यात येते आहे. या माध्यमातून आज विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विनोद पाटील हस्ते विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारतीवर तिरंगा लावण्यात आला. यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. सचिन नांद्रे, वित्त विभागाचे महेंद्र पाटील, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

विद्यापीठासह संलग्नित महाविद्यालयांमध्ये दि.०२ ते १५ ऑगस्ट, २०२५ या कालावधीत राष्ट्रीय सेवा योजना एककांमध्ये हर घर तिरंगा अभियान- २०२५ राबविण्यात येते आहे. दि.१३ ते १५ ऑगस्ट, २०२५ दरम्यान तिरंगा रॅली, मशाल रैली, तिरंगा मानवी साखळीचे आयोजन, तिरंगा महोत्सव, तिरंगा सोबत सेल्फी, रांगोळी स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, भित्तीपत्रक स्पर्धा, प्रश्न मंजूषा इ. उपक्रमाचे आयोजन महाविद्यालय स्तरावर करण्यात येत आहे.

### बातमी नं. २

जळगाव दि. १३ (प्रतिनिधी) : भारताच्या 79 व्या स्वातंत्र्य दिन व कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या 35 व्या वर्धापन दिनानिमित्त शुक्रवार दि. 15 ऑगस्ट रोजी सकाळी आठ वाजता विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. व्ही एल माहेश्वरी यांच्या हस्ते ध्वजारोहणाचा समारंभ संपन्न होणार आहे

या समारंभासाठी जळगाव शहरातील कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे अधिकार मंडळाचे सन्माननीय सदस्य, विद्यापीठ प्रशाळा, विभागचे संचालक, विभाग प्रमुख, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच प्रशासकीय विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित राहणार आहेत.

तसेच समारंभ संपन्न झाल्यानंतर हर घर तिरंगा अभियान - 2025 अंतर्गत विद्यापीठ परिसरात तिरंगा रॅली व मानवी साखळीचे आयोजन करण्यात आले आहे. यात विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी सहभागी होणार आहेत.

### बातमी नं. ३

जळगाव दि. १३ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या योगशास्त्र विभागातर्फे एम. ए योगशास्त्र प्रथम वर्ष प्रवेशित विद्यार्थ्यांचा दीक्षारंभ सोहळा रविवार दि. १० ऑगस्ट रोजी संपन्न झाला. यावेळी योगशास्त्र विभाग प्रमुख इंजि. राजेश पाटील, सहाय्यक प्राध्यापक डॉ. लीना चौधरी, प्रा. गीतांजली भंगाळे, प्रा. लिंता चौधरी, यांची प्रमुख उपस्थिती होती.

योगशास्त्र विभाग प्रमुख इंजि. राजेश पाटील व प्रा. डॉ. लीना चौधरी यांनी एम. ए प्रथम वर्ष विद्यार्थ्यांना विविध योग अभ्यासक्रम, योग आयुर्वेद युनिट, योगातील करिअरच्या संधी. NET Exam, योग स्पर्धांचा सराव व मार्गदर्शन, सेन्ट्रल आणि विभागीय लायब्ररी, योग कॉन्फरन्स, परिसंवाद, विद्यापीठ परिसराविषयी मार्गदर्शन, रोजच्या ऑनलाईन उपस्थिती प्रक्टिकल संबंधित सूचना व माहिती देत विद्यार्थ्यांच्या शंकांचे समाधान करण्यात आले. तसेच विज्ञान आणि तंत्रज्ञान विभाग नवी दिल्ली येथून योगशास विभागास मिळालेल्या अनुदानाची माहिती देऊन संशोधन करण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले.

यानंतर प्रथम व द्वितीय वर्ष विद्यार्थ्यांकडून तसेच भारत स्वाभिमान ट्रस्ट हरिद्वार, पतंजली योग समिती जळगाव यांच्या वतीने प्रा. गीतांजली भंगाळे यांचा योग विषयात पीएच डी प्राप्त केल्याबद्दल सत्कार करण्यात आला. सत्कार प्रसंगी प्रा. गीतांजली भंगाळे यांनी पीएच डी साठी कशी तयारी करावी? विषय कसा निवडावा वेळेचे व्यवस्थापन कसे करावे? संदर्भ ग्रंथांची निवड याबद्दल मार्गदर्शन केले.

त्यानंतर पतंजली योग समिती जळगाव यांच्या कार्याबद्दल तसेच भारत स्वाभिमान ट्रस्ट, हरिद्वार या बद्दल प्राचार्य नारायण मांडवडे यांनी मार्गदर्शन केले. पतंजली योगपीठ, हरिद्वार येथील संशोधन विभागात चालणाऱ्या विविध आसन, प्राणायाम, शुद्धीक्रिया या द्वारे केल्या जाणाऱ्या संशोधनांची माहिती दिली.

प्रा. लिंता चौधरी यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले. सदर कार्यक्रम प्रसंगी विभागाचे ५० विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी माधवी तायडे, तुषार सोनवणे, एकनाथ नन्नवरे, रत्नाकर सोनार, भगवान साळुंखे यांचे सहकार्य लाभले.

........................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२५ दिनांक: १३ ऑगस्ट, २०२५

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता